# अहवाल

# विज्ञानवाहिनी आयोजित शिबिर

दि.२८ मे ते ३ जुन २०१७

रविवार दि.२८ मे रोजी पहाटे ४ वाजता हेल्पर्स ऑफ दि handicapped च्या समर्थ विद्यालयाचे २४ विद्यार्थी , २ शिक्षक व तीन मदतनीस अशी २९ जणांचा समूह विज्ञान वाहिनी पुणे आयोजित शिबिरासाठी रवाना झाला. नियोजित वेळेप्रमाणे ठीक ११.५५ वाजता आम्ही ज्ञानप्रबोधिनी, सदाशिव पेठ , पुणे येथे पोहचलो. विज्ञानवाहिनीचे कार्यवाह श्री. शरद गोडसे यांनी आमच्याशी कोल्हापुरातून निघाल्यापासून ते पुणे येथे पोहचेपर्यंत संपर्क ठेवलेला होता . त्यांच्या मार्गदर्शना मुळेच आम्ही अगदी वेळेत पोहचलो.

श्री. गोडसे सर यांनी पाठवलेल्या नियोजना बरहुकुम सर्व भेटी होत होत्या. या नियोजनाला अपवाद म्हणजे हवाई केंद्र पाहणे व मंत्री महोदय यांची भेट होय. बाकी सर्व गोष्टी नियोजनाप्रमाणे झाल्या. विज्ञानवाहिनीच्या सदस्यांनी आमचे स्वागत केले . जेवणानंतर श्री.घमंडे सर यांनी शिबिराविषयी माहिती दिली.

श्री. राजीव तांबे यांनी मुलाना आवडेल अशा भाषेत नेमके मार्गदर्शन केले जे आम्हा शिक्षकांसाठीही प्रेरक होते. वाद्यवृंद सप्तसूर परिवाराच्या संगीतमय वातावरणाने मन अगदी प्रसन्न झाले. त्यामध्ये ब्राझील गाण्यावर डान्स करून मुलांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

रोजच्या कार्यक्रमाची सुरुवात साधारण ६ वाजता व्हायची व नियोजनाप्रमाणे न्याहरी , दुपारचे जेवण, रात्रीचे जेवण व्हायचे. हवाई केंद्र पाहण्याऐवजी मुलांनी कात्रज डेअरी पाहिली सर्व भेटींचा आम्ही आनंद घेतला. टाटा मोटर्स , आयसर , टीआयएफआर , भाबा अणुसंशोधन केंद्र , तिरंदाजी करणे , कात्रज डेअरी पाहणे, तारांगण पाहणे हे सर्व अनुभव म्हणजे माझ्यासाठी अपूर्व खजिनाच होता. खूप गोष्टी नव्याने समजल्या. आमच्या ज्ञानात भर पडली . सर्व व्याख्यानांबाबत बोलायचे झाले तर माझ्याकडे शब्द अपुरे आहेत. प्रत्येक वक्ता आपल्या ज्ञान आणि अनुभवाची

शिदोरी आम्हाला वाटत होते. एवढ्या अनुभवी, ज्ञानी मंडळीना पाहून मुलांसोबत आम्हालाही नवा दृष्टीकोन लाभला. यलो सिनेमा पहाताना एक नवा धडा मिळाला .गौरीला भेटल्यानंतर खूप छान वाटले.

शिबिरात भेटलेल्या बहुतेक सर्व पाहुण्यांना कोल्हापुर भेटीचे आमंत्रण दिले .

दि.३ जुन ला सकाळी आम्ही कोल्हापूरला येण्यासाठी रवाना झालो. तेव्हा गोडसे सर, गोडसे madam ,पारकर madam ,एरंडे सर , देवल सर , घमंडे सर आम्हाला निरोप देण्यासाठी बस निघेपर्यंत थांबले होते.हि सर्व मंडळी घरचीच आहेत असच आम्हा सर्वांशी वागत होते. माझ आणि विज्ञान वाहिनीशी जुळलेलं नात अधिक दृढ झाले.

मा .गोडसे सर यांचा वक्तशीरपणा अंगी बाणवावा असे मनापासून वाटते.

विज्ञानवाहीनीचे सर्व सदस्य सेवानिवृत्त असले तरी तरूणलोकांनाही लाजवेल असा सळसळता उत्साह त्यांच्यामध्ये आहें. त्यांचा पाहुणचार आणि अगत्य अविस्मरणीय असेच आहें. एक कविता या ज्येष्ठ नागरिकांसाठी , विज्ञानवाहिनी च्या सदस्यांसाठी लिहिली आहें. सर्वांची नावे लिहिणे शक्य झाले नाही.पण विज्ञान वाहिनीच्या सर्व सदस्यांना हि कविता समर्पित आहें.

ज्ञानाची आहें आस ज्यांना

विज्ञानवाहिनी आधार त्यांना ,

ग्रामीण- होतकरू, वंचित-गरजू

तयांप्रत विज्ञान प्रयोग पोहचवू .

सेवानिवृत्त होऊन वसा घेतला

विज्ञानज्योती तेवत ठेवण्याचा

आराम नको मज काम हवे

हा विश्वास रुजवण्याचा .

तरुणांनीही घ्यावा आदर्श

यांच्या कार्यमग्नतेचा,

सामाजिक भान जागृत ठेवून

सतत पुढे जाण्याचा.

- सौ. विभावरी राहुल सावंत .